**अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई**

---

**-: प्रेस नोट :-** **दिनांक २४/०५/२०२४.**

**रूपये ८० लाख किंमतीचे ''कोकेन'' या अंमली पदार्थासह एका परकीय नागरिकाला अटक.**

| | | |
|---|---|---|
| **कक्ष** | :- | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट, गु.शा., गु.अ.वि., मुंबई. |
| **गु.र.क्र. व कलम** | :- | २६/२०२४ कलम ८ (क) सह २१(क) एन. डी. पी. एस. ॲक्ट- १९८५ सह कलम १४अ, (ब) परदेशी नागरीक कायदा - १९४६. |
| **गुन्हा घडला दिनांक** | :- | दिनांक २२/०५/२०२४ रोजी |
| **गुन्हा दाखल दिनांक** | :- | दिनांक २३/०५/२०२४ रोजी |
| **गुन्हयाचे घटनास्थळ** | :- | मदनपुरा, नागपाडा, मुंबई |
| **आरोपी** | :- | ५० वर्षाचा परकीय नागरिक.(नायजेरिय देशाचा नागरिक) |
| **जप्त मुद्देमाल व मुल्य** | :- | कि.अं.रू. ८०,००,०००/- किंमतीचा २०० ग्रॅम वजनाचा 'कोकेन' हा अंमली पदार्थ. |

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट चे पथक मुंबई शहरातील अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे, पुरवठा, साठा करणारे इसमांचा शोध घेत असताना पथकास मदनपुरा, नागपाडा, मुंबई- ०८ या परिसरात एका परकीय नागरिकाच्या हालचाली संशयास्पद दिसुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचेकडे २०० ग्रॅम 'कोकेन' हा अंमली पदार्थ मिळुन आला. त्याचे आंतरराष्ट्रीय बाजारभावाप्रमाणे अंदाजे रूपये ८० लाख एवढी किंमत आहे. तसेच सदर परकीय नागरिक हा कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय भारतात बेकायदेशीर वास्तव्यास असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर परकीय नागरिकाविरूध्द एनडीपीएस कायदा १९८५ प्रमाणे तसेच परदेशी नागरीक कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली. अटक आरोपीस मा.न्यायालयासमक्ष हजर केले असता, मा.न्यायालयाने दिनांक २७/०५/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावणी आहे.

अशा प्रकारे 'अंमली पदार्थमुक्त समाज' बनविण्याचे दृष्टीने बृहन्मुंबई पोलीस दल सतत प्रयत्नशील आहे.

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. राजेंद्र शिरतोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प. वि.कक्ष, गुन्हे शाखा, वरळी युनिटचे प्रभारी पो.नि. श्री.संदिप काळे, यांचे नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि अमोल कदम हे करत आहेत.

--------------------//------------------